# मनरंग

**चंद्रकुमार नलगे**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**मनरंग : चंद्रकुमार नलगे**

© **चंद्रकुमार नलगे**

साहित्य निवास कॉलनी,
उजळाईवाडी, कोल्हापूर- ४
फोन नं : २६७७०३४

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
ऑक्टोबर, २०१२

**किंमत**
रुपये १२०/-

# मनरंग

माझी मानसकन्या
सौ. अश्विनी अ. तेली
यांच्या निरागस,
हळवेपणास हे ‘मनरंग’
अर्पण

## *मनरंग*

माझा गाव तसा दूर. डोंगर कपारीतील. शहरापासून साठ सत्तर मैलावर. अवतीभोवती सह्याद्रीच्या डोंगररांगा. शहरी वाऱ्याचं नाव नव्हतं. पावसाळ्यात तर दाही दिशा बंद. साराच कोंडमारा सहन करीत वसलेला. डोंगरांच्या पलीकडं मुलूख आहे, माणसं आहेत, निळं निळं आभाळ आहे, याची जाणही नसल्यासारखी. रानावनांचा, झाडाझुडांचा चौमुलुख. गाव छोटा डोंगराच्या कुशीत दडलेला. चावडी आणि शाळा लागूनच होती. सातवीपर्यंत शाळा. शाहूवाडी या मागासलेल्या तालुक्यात सातवीपर्यंत साऱ्या मिळून चार शाळा. त्याही दहा मैलाच्या एरियात. बाकी तालुका शीळ होऊन बसलेला.

अशा गावात माझा जन्म. पृथ्वी जन्मल्यापासून मी जन्मेपर्यंत आमच्या घरात अक्षरांचं दुरून दर्शनही नव्हतं. अठराविश्वं दारिद्र्य मात्र रात्रंदिवस वस्तीला. पडक्या झडक्या खोपड्यात दारिद्र्य हेच वैभव. तीच श्रीमंती. अर्धपोटीच दिवसरात्र झेलायचे, पण गाव असा दूर असला तरी त्याचा म्हणून एक चेहरा होता. कौलारू घरातून सुख नांदलं नसलं तरी माणसं अडाणी, भाबडी, जिवाला जीव देणारी. सगळं भावनिक वातावरण. बारा बलुतेदार, नाना प्रकाराचं बलुतं, यांनी गावगाडा चाले. ज्याचं त्याचं पोटापाण्याचं साधन जन्मत:च नेमून दिलेलं. परंपरा कधी मोडल्या नाहीत की तोडल्या नाहीत.

घरातल्या दळण कांडणानं गायिलेल्या ओव्या-गाण्यानं मनाची डवरणी झाली. आई जात्यावरच्या ओव्या किती छान म्हणत राही. कोवळ्या काळजावर त्याचे संस्कार झाले. त्या ओव्यातले जिव्हाळ्याचे नातेबंध आणि भावलयी

बालमनाला हरवून टाकीत. दळण दळताना आईच्या मांडीवर डोकं ठेवून मी तद्रुप होऊन जाई. पहाटेचं निर्मळ वातावरण, सुरेख ओव्यांनी एक छंदच जडवून टाकला. ओव्यांच्या शब्दांमधील हळुवारता, लयबद्धता मधुर साखरझोपेला जागवत राही.

भाताची सुगी म्हणजे आमचे गावचे सोनेरी दिवस. मोहरून जायचे दिवस. बाहेरचे फिरस्ते येत आणि गाव जागवत, गाजवत राहत. भल्या पहाटेचा येणारा कुडबुड्या जोशी, टाळ चिपळ्या वाजवत गाणारा वासुदेव, गोंधळगाणी म्हणणारे गोंधळी, डोंबारणीची घुंगराच्या तालावरची गाणी, पोवाडे गाणारे. दांगट, जाड कापडांवर रंगवलेल्या चित्रांचे रामायण, भारतातली कथा सांगणारे काशी कापडवाले, यल्लमाच्या जोगतिणी यांनी मनाला भुरळ पाडली. नवं नवं, खुलं झालेलं जग अनुभवताना एकरूप होऊन जाई. अकल्पित समोर बघून, ऐकून मनाला नवे पालव फुटत. हा हुंकार मला भोवंडून टाकी. खूप खूप आवडे. सणासुदीला मुलींनी, स्त्रियांनी म्हटलेली गाणी हा तर घरचाच वाण. घरात गाता गळा गुणगुणत राही आणि आपले ओठ थरथरू लागत. रंध्र रंध्र जागसूद होई. उन्हाळा आला, की आमच्या शेतामातातून धनगरांची मेढरं बसवली जात. चांदणं पडलेलं असे. रात्र चढत चाललेली असे. अशा वेळी रानामाळातून धनगरांचं सुंबरानं मांडलं अशी गाणी ऐकायला मिळत. मी तर तशा चांदण्यात, रानच्या एकांतात धनगरी ओव्या, ही गाणी ऐकायला बसे. किती छान वातावरण असे. गावात भजनं चालत. ती ऐकावीशी वाटत. त्या सूरपेटीची, मृदंगांची, टाळांची सुरावट भुलवी. अभंग, गौळणी आणि आळवलेली भैरवी अंत:करणात सामावून जाई. आमचे एक शिक्षक फाळके गुरुजी होते. त्यांना– टी.आर.पाटील यांना भजनाचा खूप छंद. मी त्यांच्या भजनाला श्रोता म्हणून जाता जाता भजनात अभंग म्हणू लागलो. एक छानसा टाळकरी झालो. अभंग आळवू लागलो. गावात कीर्तनं होत. बाहेरगावचे बुवा येत आणि कीर्तनाला गाव लोटे. गॅसच्या बत्त्यांच्या मंद प्रकाशात देवळासमोर कीर्तन चाले. रात्र अलगद कशी गेली ते समजत नसे. मला अशा कौतुकांची ओढ असे. भारावलेपण येई. कीर्तनकारांना शिधा देण्यासाठी धान्य गोळा करी. आया-बाया अगदी आनंदानं सूप, अर्धसूप तांदूळ वाढीत.

गावात कलगी तुरेवाले होते. बाळा ठाकर, जगन्नाथ तांबे त्यांची जुगलबंदी श्रावण सोमवारी, दसऱ्याला चाले. त्यांची ती शाहिरी मी ध्यान देऊन ऐकी. त्यांचे सवाल जवाब विलक्षण वाटत. पुराणकालीन कथांवर, देवाभक्तांवर, अध्यात्मिक कोड्यात हा कलगीतुरा रंगात येई. गावात दोन बुवे होते. ते मी भेटलो की मला कोडी घालीत. मी त्यांना हुशार वाटे. माझ्या हुशारीची परीक्षा घेत.

उदा. मुंगी व्याली। शिंगी झाली<br>
तिला दूध किती?<br>
अठरा रांजण भरून गेले.<br>
प्याले छप्पन हत्ती !

'दहात बसावं। दहात उठावं। गोष्ट बोला खरी। बिन बापाचा पुत्र जलमला। आईबी नव्हती घरी.' असं हे सारं. यामुळे बाहेरच्या जगाची जिज्ञासा वाढत गेली. अवतीभवतीच्या लोकांच्या जीवनासंबंधी कुतूहल वाढू लागलं. रात्र झाली. जेवणं झाली की महारवाड्यातून एकतारीवर गायिलेले अभंग ऐकू येत. महारवाड्यातील अत्तरकरबुवा किती छान अभंग म्हणत. रात्रीच्या नीरव शांततेत ऐकलेले ते एकतारीवरचे अभंग वेगळ्या जगात नेत. तंद्री लागे. त्या तंद्रीतच झोप हळूहळू डोळ्यात भरत जाई.

हागरी चांदणी उगवली, पहिला कोंबडा आरवला, की मांगवाड्यातून धिमड्याचा आवाज कानावर येई. मांगाचा नाना धिवड्यातून अभंग म्हणत राही. त्या भल्या पहाटे कानावर पडलेल्या त्या अभंगांनी मन पवित्र बने. तसंच ते ऐकत राहावं, उठूच नये, असं वाटे. असं सगळं वातावरण उत्साह वाढवी. मन तरतरीत बनवी. अवतीभवतीची ही सारी अडाणी माणसं किती छान गातात. वेडे होतात. एका बेहोशीनं झपाटून जातात. आपणाला यातील काय येते, असा प्रश्न माझ्या बालबुद्धीला पडे. जिज्ञासू मन अंतर्विरोधात, नाना प्रश्नात गुंते. आपणही काही करावं असं वाटे. आमच्या गावात शाळा होती, पण तिचा आमच्या घराण्याशी कसलाच संबंध नव्हता. सरळ वाट तिकडं जायची नाहीच. वाकड्या वाटांनी तिकडं वळायचंही नाही. जणू शाळेशी जन्मोजन्मीचं वैरच, पण माझ्या नशिबी ही वाट आली आणि अक्षर भेट झाली. अकल्पितच सारं. आधीच माझ्या जाग्या होत निघालेल्या मनाला काही तरी नवं नवं पाहून ओढ लागली. लोभ वाटला आणि...

'देवा, तुझे किती सुंदर आकाश<br>
सुंदर प्रकाश देव देतो.'

यासारख्या कवितांनी बालपणाला हुरूप आला. शाळेतील वातावरण माझ्या बावऱ्या मनात मुरत गेलं. तिथं अधूनमधून कार्यक्रम होत. अभ्यास आवडत होता आणि असलं तसलं काही आवडतही असे. माझं वाचन चांगलं होतं. मी चौथीत गेलो. मुंबईहून आलेला सुरवश्याचा गोपाळमामा. गिरणीत होता. स्वभावानं चांगला होता. त्यानं श्रावण महिन्यात आमच्या आळीत एक ग्रंथ लावायचं ठरवलं. गावात इतर गल्लीत ग्रंथ लावले जात. कुणी भटजी, कुणी मास्तर ग्रंथ वाचे. आमच्या गल्लीत कुणीच नव्हतं. गोपाळमामानं मलाच ग्रंथ वाचायला बसवलं. रोज संध्याकाळी माणसं कामधाम आटोपून ग्रंथ ऐकायला येत. मी ग्रंथवाचनाची सुरावट सोनाराच्या नरहरीकडून शिकलो. ग्रंथवाचन अडखळत का होईना जमत गेलं. अर्थाचंही असंच परिपाठाचं झालं. सातवीपर्यंत रामायण, महाभारत, पांडव प्रताप, राम विजय, हरिविजय, शिवलीलामृत इ. ग्रंथ वाचनात आले. माझं मन हळूहळू मोहरत गेलं.

पाचवीला असताना एक गोष्ट घडली. तीच माझी खरी लेखन प्रेरणा. त्या काळी आमचे गुरुजी अभ्यासासाठी रात्रीची शाळा भरवीत. स्वत:ची चिमणी किंवा चार-पाच पोरात मिळून कंदील घेऊन शाळेत जात असू. तिथंच अभ्यास करायचा. पहाटे उठून अभ्यासाला बसायचं. गुरुजीही रात्री येत असत. अशा त्यावेळी संत गाडगे महाराजांचं कीर्तन आमच्या पलीकडच्या बिळाशी या गावी होणार होतं. संत गाडगे महाराज स्वत: गाव स्वच्छ करतात. उत्तम कीर्तन करतात, असं आमच्या भागातल्या लोकांच्या कानावर होतं. आमच्या गावचे काही लोक कीर्तनाला रात्री जाणार होते. मला कुतूहल होतं. माझ्या वडिलांना तमाशा आवडीचा होता. कुस्त्यांचा फड पाहणे आवडीचं होतं. ते गावोगावच्या जत्रेला जात, मलाही नेत. कीर्तन ऐकण्यासाठी संत गाडगेबाबांना पाहण्यासाठी आम्ही पाच-सहा मुलांनी ठरवलं. केशव सावळा पाटील गुरुजी कडक होते. शिस्त त्यांना आवडे. शिकवण्यात हुशार. त्यांना भीत भीत आम्ही आमच्या मनाची बात बोललो. रात्र अंधारी, वाटेत आडवी वारणा नदी. तुडुंब भरलेली. जवळजवळ सहा-सात मैल चालत जाणं. हे ध्यानी घेऊन गुरुजींनी नकार दिला. आमची चुळबूळ वाढली. आमची हिम्मत वाढलेली पाहून ते म्हणाले,

'ठीक आहे, एका अटीवर सोडेन.'

'कोणत्या गुरुजी?' मी तोंडातल्या तोंडात म्हटलं. ते म्हणाले,

'तुम्ही उद्या शाळेला येताना पंधरा ओळींचा तुम्ही ऐकलेल्या कीर्तनावर निबंध लिहून आणायचा.' जायला मिळतंय म्हटल्यावर आम्ही होकार भरले. काट्याकुट्यांची वाट तुडवत, अंधाऱ्या रात्रीचं, नदीतून पोहून जाऊन, भर थंडीतून बिळाशी गाठली. तिथल्या माळावर गॅस व त्यांच्या प्रकाशात तुडुंब गर्दीत संत गाडगेबाबांचं कीर्तन चालू होतं. परिसर भारून गेला होता. आमच्या इवल्या इवल्या डोळ्यांनी, इवल्या इवल्या कानांनी टाळ मृदंगांच्या तालावर चाललेलं कीर्तन श्रवण केलं. पाहिलं. माझ्यावर विलक्षण प्रभाव पडला. पहाट केव्हा झाली, कळलं नाही. घरी आल्यावर निबंध केव्हा लिहिला समजलं नाही. गुरुजींनी निबंध वाचला आणि माझ्याकडं पाहतच राहिले. साऱ्या शाळेतल्या वर्गावर्गांतून निबंध वाचून दाखविला. जपून ठेवला आणि शाळा तपासायला आलेल्या दिपोटीसाहेबाला दाखविला. त्यांनी माझं कौतुक केलं. पाठीवर शाबासकीचा हात फिरवला आणि त्यातूनच माझ्या हातात लेखणी आली. काहीबाही लिहावंसं वाटत राहिलं.

गावची शाळा फार चांगली होती. शिक्षक गुणी होते. शाळेचं वाचनालय होतं. गुरुजी या वाचनालयातली पुस्तकं सक्तीनं वाचायला देत आणि या पुस्तकांवर बोलण्यासाठी दर शुक्रवारी शेवटचे दोन तास 'बालसभा' (डिबेटींग) घेत. त्यामुळं अनेक पुस्तकं वाचून होत. साने गुरुजींचे 'धडपडणारी मुलं' हे पुस्तक तिथंच वाचलं. धडपड हा शब्द अंत:करणात रुजत गेला.

गावात 'श्री समर्थ वाचनालय' या नावाचं वाचनालय होतं. तिथली पुस्तकं मला वाचायला मिळत. वाचन वाढतच गेलं. पुण्याचा 'केसरी', 'शालापत्रक', नागपूरचं'आनंद' मासिक, 'किर्लोस्कर' मासिक ही पोस्टानं येत. त्यांच्या फायली करून भिंतीवर अडकवलेल्या असत. फाईल लावण्याचं काम गुरुजी मला सांगत. फाईल लावता लावता आपसूकच कुतूहल जागं होई. मी वाचत राही. जग कळत राही. शाळेत गणपती उत्सवात कार्यक्रम केले जात. नाटिका, एकांकिका बसविल्या जात. मला त्यात भाग घ्यायला लावीत. मी काम चांगलं करीत असावा. स्त्री भूमिका माझ्या वाट्याला येई. मला नाटकात काम करणंही आवडत असे. शाळेत एकांकिका बसविण्यासाठी गुरुजी पुस्तकं कोल्हापूरला जाऊन शोधून आणीत. एका वर्षी एकांकिकेचं पुस्तकं मिळालं नाही. कार्यक्रम तर नित्याप्रमाणे केला पाहिजे. गुरुजींना कोडं पडलं आणि त्यांनी मला कोडं घातलं. म्हणाले,